## ॥ बाबा ॥

## हार

वांगणीच्या बाबा देवांना हार घालू या ग
गजरा वाहू या ॥ धृ ॥

मन रूपी मोगरा घेऊन भाव भक्ति त्यातच घालून
सुबुद्धी माळीण कुशल बहुत मोह सोडून
तो मग हार गुंफू या॥ 1 ॥

मी तु पण सर्व जाऊन, निगुर्णचं पिंपळपान
झाले आता जाळीदार, त्याच्यापायी
सतत हार घेऊ या ॥ 2 ॥

अंधाराच्या ह्रदयांत । नाम फुले गुंफून त्यात
फुलली ती आत्मज्योत । चैतन्याच्या प्रकाशात
बाबा पाहु या ॥ 3 ॥

वांगणीच्या बाबा देवांना हार घालू या ग
गजरा वाहू या ॥ 4 ॥

★★★★★